# उप वनसंरक्षक, अलिबाग वन विभाग, अलिबाग यांचे कार्यालय

मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड, पीन नं. ४०२२०१, फोन नं. ०२१४१-२२२०१६, फॅक्स नं. ०२१४१-२२२२१६

ईमेल - dycfalibag@mahaforest.gov.in

महाराष्ट्र वन विभाग


**पत्र**

विषयः- **वन जमिन रायगड**

बेरिंग जेट्टीचे बांधकाम करण्यासाठी व सिमेंट वाहतुक करण्यासाठी मौजे शहाबाज आणि शहापूर येथील वनजमिन वळतेकरण प्रस्ताव 0.6497 अदानी सिमेंन्टेशन लि.

जावक क्र. ब/20/जमिन/ 2680/2019-20.
अलिबाग 402 201, दिनांकः 28 /08/2019.

प्रति,

अदानी सिमेंनस्टेशन
अदानी हाऊस
शांतीग्राम, एस जी हायवे
अहमदाबाद-382241

संदर्भः- 1) आपले कडील दिनांक 19/06/2019 रोजीचे पत्र.
2) या कार्यालयाकडील पत्र क्र. ब/20/जमिन/1762, दिनांक 08/07/2018.
3) आपलेकडील पत्र क्र. एसीएल/इएनव्ही/आरसीबीटी/फॉरेस्ट/07-19/10, दिनांक 30/7/2019.

आपण संदर्भिय पत्र क्र. 3 अन्वये मौजे शहाबाज व शहापूर येथे बेरिंग जेट्टी बांधकाम करण्यासाठी सिमेंट वाहतुक करण्याकरिता कन्वेअर बेल्ट उभारण्यासाठी वन (संवर्धन), अधिनियम 1980 अंतर्गत वन जमिन मागणी प्रस्ताव 0.6497 हेक्टर या कार्यालयास 1 प्रतीत दाखल केला आहे. सदर प्रस्तावाची छाननी केली असता खालीलप्रमाणे त्रुटी आढळुन आल्या आहेत.

1. प्रस्तावासोबत जोडलेल्या 1:50000 या प्रमाणातील टोपोशीटवर नजीकचे अभयारण्या पासुनचे व इको सेन्सिटिव्ह झोन पासुनचे प्रस्तावित प्रकल्पाचे अंतर, अक्षांश/रेखांश व वनक्षेत्र मागणी तक्ता दर्शविणेबाबत कळविले होते. परंतु आपणाकडून त्रृटी पूर्ततेमध्ये सादर केलेल्या 1:50000 चे प्रमाणातील टोपोशीट मुळ प्रमाणाचे आकारात नाहीत. तसेच त्यावर नजीकचे कर्नाळापक्षी अभयारण्याचे क्षेत्र व इको सेन्सिटिव्ह झोनचे टोपोशिटवर व्यवस्थित दर्शविलेले नाही व क्षेत्र विवरण तक्ता दर्शविलेला नाही. तसचे सुचि दर्शविलेली नाही. तरी याची पूर्तता करणेत यावी.

2. प्रस्तावात सादर करण्यात आलेल्या गाव नकाशावर दर्शविलेल्या क्षेत्राचे आखणी प्रमाणे क्षेत्र व क्षेत्र विवरण तक्त्यात दर्शविलेले क्षेत्र यांचा ताळमेळ बसत नाही. तरी गाव नकाशावर गाव

नकाशाचे मुळ प्रमाणाप्रमाणे मागणी क्षेत्र दर्शविणे आवश्यक आहे. जेणेकरुन क्षेत्र विवरण तक्त्यात दर्शविलेले क्षेत्र व नकाशावरील आखणी प्रमाणे दर्शविलेले क्षेत्र यांचा ताळमेळ होईल.

3. प्रस्तावासोबत कांदळवन क्षेत्रापासुनचे 50 मी बफर झोन मधील क्षेत्रातील मागणी दर्शविलेली आहे. याबाबत Buffer Zone मध्ये प्रस्तावित कामे करणेसाठी नियमाप्रमाणे ती दर्शवणे आवश्यक आहे.

4. प्रकल्पयंत्रणेने वनजमीन मागणी क्षेत्राचे 7/12 उतारे सादर केले नाहीत ते सादर करावेत.

5. प्रस्तावासोबत सादर करण्यात आलेली केएमएल फाईल ची सीडी अचुक मागणी क्षेत्र दर्शवुन सादर करावी.

6. प्रस्तावातील त्रुटी पुर्ततेत गाव नकाशावर दर्शविलेल्या वनजमिन मागणी क्षेत्राचा वैधानिक दर्जा अचुक दर्शविणे आवश्यक आहे.

7. प्रकल्पयंत्रणेने मागणी केलेल्या प्रस्तावित क्षेत्रात करावयाचे विकासकामासाठी लागणारे साहित्याची वाहतुकीसाठी कोणत्या मार्गाचा वापर करणेत येणार आहे. त्याचा आखणी मार्ग गाव नकाशावर दर्शवुन त्याचा वैधानिक दर्जा स्पष्ट करणे आवश्यक आहे.

8. कन्वेर बेल्ट ज्या प्रकल्पाचे विकासासाठी मागणी करणेत येत आहे. त्याचा तपशील व त्यामध्ये समाविष्ट असलेले गावनिहाय, सर्व्हे नंबर निहाय क्षेत्र व त्याचा वैधानिक दर्जा मागणी प्रस्तावात समाविष्ट करुन त्याचे 7/12 उतारे जोडने आवश्यक आहे.

9. प्रस्तावात जिल्हाधिकारी यांचेकडील वनहक्क कायदा, 2006 अंतर्गत प्रमाणपत्र सामिल असणे आवश्यक आहे.

10. प्रस्तावावर स्वाक्षरीकर्ता हयांचे प्राधिकारपत्र प्रस्तावांत सामील करणेत यावे. तसेच ज्या ज्या ठिकाणी प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता हयांची स्वाक्षरी असेल त्या त्या ठिकाणी त्यांचे नांव, पदनाम व त्यांचा कार्यालयीन शिक्का उमटविण्यात यावा.

तरी वरील प्रमाणे त्रुटींची पूर्तता करुन 1 ते 57 बाबींचे चेकलीस्ट प्रमाणे प्रस्तांवाचा परिपूर्ण संच तयार करुन 8 प्रतीत या कार्यालयास दाखल करावा.

(मनीष कुमार)
उप वनसंरक्षक,
अलिबाग.

प्रतिलिपी:- मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांचेकडे माहितीसाठी सादर.

प्रतः- परिक्षेत्र वन अधिकारी, अलिबाग व सहा. वनसंरक्षक, अलिबाग यांचेकडे माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.

2/- त्यांनी बाधीत होणारे क्षेत्रांतील वृक्षांचे तोडीकरीता वृक्षतोडीचे अंदाजपत्रक व वृक्षांची यादी तयार करुन सादर करावी. तसेच पर्यायी वनीकरणाकरीता 1.00 हेक्टर अवनत वनक्षेत्र सुचविण्यात येऊन त्याबाबतची अवश्यकती सर्व माहिती व नकाशे सादर करणेत यावेत.